**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

| VOL- VIII | ISSUE- VI | JUNE | 2021 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.149 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# डॉ.जनार्दन वाघमारे यांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीचा विश्लेषणात्मक अभ्यास

संशोधक मार्गदर्शक
डॉ लक्षटे आर. बी.
सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय,देगलूर

संशोधक विद्यार्थी
सुमेद चापाजी गुंडेराव
मु.पो.दिवशी बु.
ता.भोकर जिल्हा-नांदेड

**१.प्रस्तावना**

प्रत्येक माणसाचे जिवन हा एक प्रकारचा वैयक्तिक इतिहासच असतो. प्रत्येक व्यक्तिला, स्त्रि-पुरुषाला आयुष्याच्या रुपाने एक कॅनव्हास प्राप्त झालेला असतो. ती व्यक्ती स्वत:च्या कॅनव्हासवर आपले जिवन चितारतात व त्यात रंग भरतात. त्याच्या जिवनाचा आशय आणि अर्थ त्यामध्ये व्यक्त झालेला असतो.

कर्तृत्ववान व्यक्तिचे कार्य इतरांना मार्गदर्शक ठरते. समाज पुढे जावा आणि त्याची प्रगती व्हावी यासाठी त्यांची धडपड असते. खरेतर कृर्तृत्ववान व्यक्ती ह्या समष्टिचे रुप धारण करतात. त्यांचे कार्यक्षेत्र हेच त्यांचे विश्व असते. कार्य जसजसे वाढत जाते तसतसे त्यांचे व्यक्तिमत्व विकास पावते. त्यांच्याकार्य-कर्तृत्वामुळे समाजाला समृद्धी प्राप्त होते. कर्तृत्ववान व्यक्ती ह्या अखंडपणे वाहणा-या जलप्रवाहातील तरंग व लाटा असतात.

महाराष्ट्रातील अनेक कर्तृत्ववान व्यक्तिंपैकी एक व्यक्तिमत्व म्हणजे डॉ जनार्दन वाघमारे ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने लातुर व मराठवाड्यातच नव्हे तर महाराष्ट्रात आपली स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. “Rome was not built in a day.” या म्हणी प्रमाणे व्यक्तीमत्व विकसीत होण्यासाठी त्या व्यक्तिने त्याच्या संपुर्ण शक्तिनिशी संपुर्ण आयुष्य प्रयत्न केलेले असतात. डॉ जनार्दन वाघमारे यांचे जिवनही संघर्षमय व प्रेरणादायी आहे. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्व जडणघडणीचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**२.संशोधन लेखाचे उद्देश -**

प्रस्तुत संशोधन पर लेख खालील उद्देशाना प्रमाण मानून लिहण्यात आला आहे.

१. डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या प्रेरणादायी कर्तृत्वाचा परिचय करुन घेणे.

२. डॉ. जनार्दन वाघमारे यांच्यावर असलेल्या प्रभावाचे विश्लेषण करणे.

**३. संशोधन लेखाचे गृहितक -**

डॉ.जनार्दन वाघमारे यांचे जिवन/व्यक्तिमत्व आजच्या पिढिस प्रेरणादायी आहे. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी सामाजीक शास्त्रातील संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला. ज्यामध्ये ऐतीहासिक विश्लेषणात्मक ,वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला. तसेच ग्रंथालयीन पध्दतीचा आधार घेण्यात आला.

**४. डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीस प्रभावित करणारे घटक -**

विद्यार्थी दशेत त्यांचा संबंध मराठवाडा मुक्ती संग्राम चळवळ व स्वातंत्रता चळवळ यांच्याशी आला. या चळवळीतील आग्रभागी असणा-या नेतृत्वाचाही प्रभाव त्यांच्यावर पडला. त्यात आर्य समाजाचे स्वामी दयानंद सरस्वती व कॅाग्रेसचे म. गांधी ,पं. नेहरु,सरदार पटेल इ हे होते. आर्य समाजाचा जातीनिरपेक्षाद तर कॅाग्रेसचा धर्मनिरपेक्षवाद त्यांना भावला. पुढे डॉ बाबासाहेब आंबेडकर वाणिज्य महाविद्यालयात कार्यरत असताना त्यांच्यावर आंबेजडकरी चळवळीतुन फुले-शाहु-आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव पडला. येथुनच लेख लिखाणास त्यांनी सुरवात केली.

त्यांच्यावर पडलेल्या या प्रभावातुनच त्यांनी स्वत: आंतरजातीय विवाह केला. राष्ट्रिय सेवाग्राम हे गाव विवध जाती एकत्रीत राहतील अश्या पध्दतीने वसवले. नामांतर चळवळीमुळे निर्माण झालेली समाजातील दरी कमी करण्यासाठी त्यांनी विषमता निर्मुलन शिवीर भरवले. त्यांनी लातुरमध्ये हमाल पंचायच्या स्थापनेसाठी प्रोत्साहन दिले. त्यामुळे त्यांना तात्कालीन लोकांचा विरोध पत्कारावा लागला. त्यांच्या वरिल प्रभाव व विचारांनुसार त्यांना राष्ट्रवादी पक्ष जवळचा वाटला. राष्ट्रवादी कॅाग्रेस पक्षाचे ते नऊ वर्ष उपाध्यक्ष होते. हया पक्षातुनच ते नगराध्यक्ष व राज्यसभा सदस्य म्हणुन निवडुन आले होते.

**५. डॉ.जनार्दन वाघमारे यांचे जीवन परिचय :**

**अ.जन्म -**

डॉ.जनार्दन वाघमारे यांचा जन्म त्यांचे आजोळ जानवळ ता.चाकुर येथे झाला. त्यांच्या वडिलाचे नाव माधवराव तर आई रुक्माबाई . त्यांचे गाव कौठा ता.निलंगा हे असुन ते लातुर जिल्हयात येते. डॉ.जनार्दन वाघमारे यांची जन्म पत्रीका उपलब्ध न झाल्याने शाळेत नाव टाकत असताना त्यांच्या शिक्षकांनी त्यांची जन्म तारिख ११ नोव्हेंबर १९३४ टाकली.

**ब.शिक्षण-**

डॉ.जनार्दन वाघमारे यांचे चौथीपर्यंतचे शिक्षण त्यांचे गाव कौठा, आजोळ जानवळ, गाव शेजारील होळी व गौर या गावच्या गावठी शाळेत मोडी लीपीत झाले. पुढिल शिक्षणासाठी त्यांनी लातुरच्या सरकारी शाळेत प्रवेश घेतला.तिथे त्यांनी आठवी पर्यंतचे शिक्षण पुर्ण केले. इयत्ता नववी व दहावी चे शिक्षण त्यांनी राजस्थान हायस्कुल मधुन पुर्ण केले. त्यांनी बी.ए. इंग्रजी चे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ हैद्राबाद येथुन पुर्ण केले व एम.ए. चे शिक्षण त्यांनी पुणे विद्यापीठातुन पुर्ण केले. पुढे नोकरी करीत असताना त्यांनी एल.एल.बी. व एल.एल.एमचे शिक्षण पुर्ण केले. त्यांनी डॉ.वानखेडे व डॉ.जी.एम. आमुर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी.चे शिक्षण पुर्ण केले. डॉ.जनार्दन वाघमारे यांच्या जिवनातील एम.ए. पर्यंतच्या शिक्षणाचा काळ अत्यंत खडतर होता. घरची परिस्थिती बेताची व मोठ्या शहरात राहुन शिक्षण घेण्याचा खर्च जास्त यासर्वांतुन मार्ग काढत शिक्षण पुर्ण केले.

**क. उच्च शिक्षणातील जडणघडण**

सन १९७९ मध्ये उमरगा येथील शिवाजी महाविद्यालयात इंग्रजीचा प्राध्यापक म्हणुन त्यांची निवड झाली. सन १९६२ ते १९६४ पर्यंत ते डॉ.बाबासाहेब वाणिज्य महाविद्यालयात कार्यरत होते. सन १९६४ ते १९७० या कालावधीत ते देवगीरी महाविद्यालयात कार्यरत होते. हया तिनही महाविद्यालयात त्यांनी एक प्राध्यापक म्हणुन नावलोकीक मिळवला ज्याचा परिणाम म्हणुन त्यांना मराठवाड्यातील नव्याने सुरु होणा-या विविध महाविद्यालयातील प्राचार्य पदासाठी विचारना होऊ

लागली. त्यांनी लातुरच्या श्री शाहु महाविद्यालयास पसंदी दिली. लातुर मधील दोन नामांकित महाविद्यालये असताना त्यांच्याशी स्पर्धा करुन आपल्या महाविद्यालयास नावरुपला आणने हे सोपे काम नव्हते. महाविद्यालय उभारणित डॉ.वाघमारे यांचा सिंहाचा वाटा आहे. कारण, नविन शैक्षणिक धोरण जाहीर झाल्यानंतर विद्यार्थी संख्या कमी होईल व कॅालेज बंद पडेल अशी परिस्थिती होती. डॉ.जनार्दन वाघमारे यांनी संस्थाचालकांस विश्वासात घेवुन सहकारी प्राध्यपकांच्या मदतीने महाविद्यालय शहरात हलवले व विद्यार्थांवर एवढी मेहनात घेतली की, त्यांचे विद्यार्थी राज्याच्या गुणवत्ता यादित येवु लागले. येथेच लातुरपॅटर्न चा जन्म झाला. फक्त लातुरच नाही तर संपुर्ण महाराष्ट्राने त्यांची दखल घेतली व एक शिक्षणतज्ञ म्हणुन ते नावारुपाला आले.

डॉ.जनार्दन वाघमारे यांचे नाव जसे सामान्यापर्यंत पोहचले तसेच ते राजकारणातील उच्चपदस्त व्यक्तींपर्यंतही पोहचले. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या वादातुन नांदेडला स्वामी रामानंद तिर्थ हे नवीन विद्यापीठ देण्याचे तात्कालीन मुख्यमंत्री श्री शरद पवार यांनी जाहीर केले आणि त्या विद्यापीठाचे पहिले कुलगुरु म्हणुन डॉ.जनार्दन वाघमारे यांची निवड करण्यात आली. पहिले कुलगुरु असल्यामुळे त्यांनी फक्त इमारतच नाही तर विद्यापीठाच्या सर्व क्षेत्रात पायाभरणीचे काम केले व एक नामांकीत विद्यापीठ बनवण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी संकुल पध्दती सुरु केली. नविन शैक्षणिक वेळपत्रक, अभ्यासक्रम पुर्नरचना, नविन पाठ्यापुस्तके निर्मिती .परिक्षा पध्दती , प्रवेश पध्दती यामध्ये सुधारणा केल्या. कॅापी मुक्ती साठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. संशोधनासाठी मराठवाड्याशी संबंधीत विषयांना प्रोत्सान दिले. अनेक प्रसंगी त्यांना हे कार्य करत असताना विरोधही झाला परंतु ते नियमानुसार कर्तृत्व पार पाडत असल्यामुळे विरोधकांना माघार घ्यावी लागली.

**ड. राजकीय क्षेत्रातील जडणघडण -**

एक प्राचार्य व कुलगुरु म्हणुन त्यांचे नाव प्रसिध्द झाले होते. निवृत्तीनंतर ते लातुरमध्येच राहत होते. नगराध्यक्षांची निवडणुक समोर होती. One good example is worth of thousand theories. या सुविचाराप्रमाणे काम करण्यासाठी ते लोकआग्रहास्तव राष्ट्रवादि कॅाग्रेस तर्फे निवडणुक लढवुन प्रस्तापिता विरोधात निवडुन आले.

डॉ.जनार्दन वाघमारे यांनी एक आदर्श नगराध्यक्ष कसा असतो हे आपल्या कार्यातुन दाखवुन दिले. त्यांनी स्वाभीमानाने,सचोटिने व प्रामाणिकपणे जणकल्याणाची कामे जातीने लक्ष देवुन पुर्ण करुन घेतली.त्यांनी अनेक भ्रष्ट्राचाराची प्रकरणे उघडकीस आणुन प्रस्तापितांना धक्का दिला. पायाभुत सुविधा रस्ते,नाल्या,पथदिवे,व्यापारी संकुले , ग्रंथालय ,शैक्षणिक सुविधा यांच्या विकासावर भर दिला. लातुरचा पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनि विशेष प्रयत्न केले. सकारात्मक प्रशासन केले. लातुर शहारासाठी व्हिजन २०२५ यथार्थ विकास आराखडा त्यांनी मांडला. त्यांच्याच कार्यकाळात तीन वेळेस (एकदा प्रथम तर दोनवेळेस व्दितीय) संतगाडगेबाबा स्वच्छता पुरस्कार मिळाला.

**१. राज्यसभा सदस्य-**

राष्ट्रवादी कॅाग्रेस पक्षाचे अध्यक्ष मा.शरद पवार यांनी डॉ.जनार्दन वाघमारे यांना राज्यसभेसाठी संधी दिली. दि.१८ मार्च २००८ रोजी विधानसभा सदस्याद्वारे राज्यसभा सदस्य म्हणुन त्यांची निवड झाली.

डॉ.जनार्दन वाघमारे यांनी राज्यसभासदस्य म्हणुन सभागृहात अनेक विषयावर आपले मत

VOL- VIII ISSUE- VI JUNE 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

मांडले. अनेक विधेकांवर बोलत असताना सुधारणा सुचवल्या. संसदेतील विविध समित्यांवर त्यांनी काम केले. HRD (Human resources and development ) या समितीवर त्यांनी पाच वर्ष काम केले. सभागृहात राष्ट्रवादीर पक्षाचा प्रदोत म्हणुन भुमिका पार पाडली. त्यांनी राष्ट्रसंघाच्या ६४ व्या अधिवेशनात सहभाग नोंदवला. भारताच्या वतीने त्यांनी support by the united nations system of the efforts of governments to promote and consolidate new or retorted democracies. याविषयावर स्टेटमेंट सादर केले. तसेच राज्यासभा सदस्य फंडातुन अनेक विकास कामेही त्यांनी केली. त्यांची सभागृहातील उरस्थिती सरासरी ७६ टक्के होती.

**इ. साहित्यिक क्षेत्रातील जडणघडण** -

डॉ.जनार्दन वाघमारे हे एक साहितीक व विचारवंत म्हणुन महाराष्ट्रास परिचित आहेत. त्यांची आतापर्यंत ३७ पुस्तके प्रकाशित झाली असुन त्यात मराठी , हिंदी व इंग्रजी या तिनही भाषेतुन त्यांनी लेखन केले आहे. सदरील पुस्तकांमध्ये चौफेर सर्व क्षेत्रास स्पर्श करणारे लेखन अभ्यासावयास मिळते. मुठभर माती व यमुनेचे पाणी (आत्म चरित्रपर लिखाण ),लोकशाही आणि शिक्षण ,चिंतनयात्रा ,ज्ञान-विज्ञानाच्या देशात ,मंथन ,विमर्श ,व्यक्तित्व आणि कर्तृत्व ,सहजीवन ,चिंतन एका कुलगुरुचे, चिंतन एका नगराध्यक्ष इत्यादी लेखन महत्वाचे आहे.

**६. निष्कर्ष**-

महाराष्ट्रातील एक उच्च शिक्षतज्ञ,अभ्यासक विचारवंत अशी डॉ जनार्दन वाघमारे सरांनी ओळख निर्माण केली असुन त्यांचा जिवनप्रवास आजच्या युवा पिढिस प्रभावित व आकर्षीत करतो आहे. तसेच शिक्षणाच्या प्रचार प्रसासातुन राजकारणात काम करण्याची संधी मिळु शकते, हाही सरांच्या व्यक्तीमत्वातुन भावनारा मुद्दा आहे. जो आजच्या युवकांना प्रेरणादायी आहे.

**संदर्भ ग्रंथ** -

१.मूठभर माती - डॉ जनार्दन वाघमारे-पद्मगंधा प्रकाशन -पुणे -२००८
२.यमुनेचे पाणी - डॉ जनार्दन वाघमारे- पद्मगंधा प्रकाशन -पुणे -२०१८
३.माय डेज इन पार्लमेंट - डॉ जनार्दन वाघमारे- सुगावा प्रकाशन -पुणे -२०१७
४.डॉ जनार्दन वाघमारे यांची मुलाखत दि.१२ फेब्रुवारी २०१९

Principal
A.V.Education Society
Degloor College Degloor